# मेट्रो-३ डिसेंबरअखेरपर्यंत

## पहिल्या टप्प्याचे ९० टक्के काम पूर्ण

मुंबई, ता. १२ : मुंबईतील बहुप्रतीक्षित भूमिगत मेट्रो-३ च्या पहिल्या टप्प्याचे काम वेगाने सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील आरे ते बीकेसी मार्ग डिसेंबरअखेरपर्यंत मुंबईकरांसाठी खुला केला जाणार आहे. या टप्प्याचे ९०.३ टक्के काम पूर्ण झाले असून, ही संपूर्ण भूमिगत मेट्रोसेवा जून २०२४ पर्यंत पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचा मुंबई मेट्रोचा मानस आहे. मेट्रो-३ ही भारतातील पहिली मेट्रो मार्गिका आहे जी 'ट्रॅक हाय अ‍ॅटेन्युएशन लो व्हायब्रेशन' प्रणाली वापरून उभारण्यात आली आहे. ज्यामुळे कंपन कमी होईल, प्रवाशांसाठी कार्यक्षमता आणि आरामात वाढ होईल.



### ३१ जुलैपर्यंतचा आढावा

| | |
|---|---|
| मेट्रो-३ चा पहिला टप्पा | आरे ते बीकेसी |
| किती काम पूर्ण | ९०.३ टक्के |
| स्थानक-बोगदे | ९८.२ टक्के |
| स्थानकांचे स्थापत्य | ९४.५ टक्के |
| उर्वरित कामे | ७०.५ टक्के |
| ट्रॅक उभारणी | ९७.७ टक्के |
| ओसीएस वर्क | ६०.२ टक्के |